**शपथेवर उलटतपासणी जाबदार यांचेतर्फे विधीज्ञ श्रीमती एस. के. गोसावी यांचेमार्फत सुरू**

६. मी कोल्हापूर जिल्हयातील रहिवासी असून अर्जदार हे सांगली जिल्हयातील रहिवाशी आहेत. मी दुर्गामाता पॅकेजिंगमध्ये स्वत: कधी गेलो नव्हतो. अर्जदार यांच्या कामाचे स्वरूप मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. अर्जदार या जाबदार यांचेकडे काम करीत असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नाही.

७. अपघाताची माहिती ही ऐकीव स्वरूपाची आहे. जाबदार कंपनीचे मालक कोण आहेत याची कागदपत्रे मी पाहिलेली नाहीत. अपघाताबाबत अर्जदार यांनी पोलिस केस केलेली नव्हती. अर्जदार यांची जाबदार यांचेकडे प्रॉव्हीडंट फंड आणि ई.एस.आय. बाबत नोंद नव्हती याबाबत मला माहिती नाही. दवाखान्याचा खर्च कोणी केला होता याची मला वैयक्तिक माहिती नाही. अपघात हा माझे बहिणीच्या निष्काळजीपणामुळे झाला होता हे म्हणणे खरे नाही. सध्या अर्जदार हया अन्य ठिकाणी कामास जातात हे म्हणणे खरे नाही. जाबदार हे अर्जदार यांना कोणतीही नुकसानभरपाई देणे लागत नाही हे म्हणणे खरे नाही.

८. परशुराम शिंदे हे जाबदार यांचेकडे काम करत असल्याची माझी ऐकीव माहिती आहे हे म्हणणे खरे नाही. बबन पाडळकर यांचेसोबत अर्जदार यांना रूग्णालयात दाखल केल्याचे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. अर्जदार यांचा अपघात हा जाबदार यांचेकडे काम करीत असताना झाल्याचे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. अर्जदार यांना नुकसानभरपाई मिळणेसाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SACHIN GOURIHAR KORE
Date: 2026.02.27 12:37:31 +0530

स्थळ : सांगली

दि. २७/०२/२०२६

( एस. जी. कोरे )
आयुक्त, कर्मचारी नुकसानभरपाई कायदा
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली